# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/01/2024 (मंगळवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ कि. मी. अंतरावर मौजा भुगाव येथे दिनांक ०८/०१/२०२४ चे ०९.३० वा. ते १७.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— ग. भा. कांताबाई शालीक उपरीकर, वय ६५ वर्ष रा. भूगाव ता. कामठी ही सकाळी ०९/३० वा. दरम्यान शेतीमध्ये मजूरीच्या कामाला घराला कुलूप लावून गेली होती कामावरून सायंकाळी ०५/३० वा. दरम्यान घरी कामावरून परत आली. दरवाजा उघडला व घरात गेली घरातील लाईट व पंखा सूरू असल्याचे दिसले. म्हणून संशय आल्याने लोखंडी आलमारी उघडून पाहण्यास गेली असता आलमारीचा दरवाजा उघडलेला दिसला म्हणून सोन्याचे दागिने ठेवलेले भांडे डब्बा बघितले असता डब्बा दिसला नाही कोणीतरी अज्ञात चोराने सामठीमध्ये ठेवलेल्या चाबीच्या सहाय्याने फिर्यादीच्या घराचे कुलूप उघडून आत प्रवेश केला व लोखंडी आलमारीचे दार तोडून त्यामध्ये स्टीलच्या डब्ब्यात ठेवलेले जुने वापरीतील सोन्याचे दागिने १) १५ ग्रॅमची मोठया व लहान मण्याची सोन्याची एकदाणी किंमती ६०,०००/—रूपये २) ०५ ग्रॅम सोन्याची अंगठी किंमती अंदाजे २०,०००/—रूपये ३) ०५ ग्रॅम सोन्याची बारीक मण्याची खिचडीपोत किंमती अंदाजे २०,०००/—रूपये ४) ०३ ग्रॅम सोन्याची नथ किंमती अंदाजे १२,०००/—रूपये ५) ०३ ग्रॅम सोन्याच्या बिऱ्या किंमती अंदाजे १२,०००/— रूपये ६) ०२ ग्रॅम सोन्याची नथ किंमती अंदाजे ८,०००/—रूपये ७) ०५ तोळे चांदीच्या पायपट्टी जोड किंमती ४,००० व नगदी ४,६००/—रूपये असा एकुण १,४०,६००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग कन्हान पुंडलिक भटकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पराग भाउराव पोटे पोस्टे मौदा यांनी भेट दिली असुन सदर घटनास्थळी फॉरेन्सिक वाहनाने भेट दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी मो. क्र. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. देवलापार** :— अंतर्गत मौजा देवलापार पो.स्टे. जवळ, एन. एच ४४ जबलपुर ते नागपुर रोड येथे दिनांक ०७/०१/२०२४ चे १३.५० वा. ते १४.२० वा. दरम्यान पोलीस स्टेशन देवलापार येथील पोलीस पथक पोलीस स्टेशन देवलापार हद्दीत नाकाबंदी करीत असताना मुखबिरद्वारे मिळालेल्या खबरे वरुन एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन देवलापार पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एक लाल रंगाचा आयसर क्र. एम.एच.—३४—बीजी—८९९४ चा फरार आरोपी चालक याने त्याच्या ताब्यातील वाहनात ४२ गोवंश जनावरे हे अतिशय आखुड दोराने बांधुन एकमेकांवर रचुन व त्याचेवर पाट्या लावून त्यावर जनावरांना आखुड दोरीने व अतिशय दाटीवाटीत कोंबून बांधून त्यांना कोणतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तली करीता वाहतुक करिता नेत असतांना मिळुन आल्याने एकुण गोवंश किंमती ४,००,०००/—रु. चा व लाल रंगाचा आयसर क्र. एम. एच.—३४/बी.जी—८९९४ अंदाजे किंमती १२,००,०००/—रु. असा एकुण १६,००,०००/—रु. चा मुद्देमाल वाहतूक करतांना मिळुन आल्याने तो जप्त करुन ४० जिवंत गोवंश बैल व ०२ मयत गोवंश बैल श्रीकृष्ण गौरक्षण संस्था, गोंडेगाव, ता. नरखेड, जि. नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**